ePaper

## शिंदेंच्या खासदारांच्या मतदारसंघांवर भाजपचा डोळा? लोकसभा रणनिती ठरली



|वर्ष - 6 ।अंक - 228 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

■ मनोरुग्णालयाच्या जागेवरील बेकायदा झोपड्या हटविण्याचे आदेश
■ कर्नाटकनं महाराष्ट्राला पुन्हा डिवचलं!
■ काँग्रेसच्याच काळात वाढली गरिबी, मोदींचा हल्लाबोल

www.mahaenews.com |।शुक्रवार।दिनांक 2 डिसेंबर 2022 | पुणे । महाईन्यूज आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# वाघ एकला राजा, बाकी खेळ माकडांचा!

## आमदार लांडगे यांच्या मंत्रीपदाची धास्ती : सर्वपक्षीय स्थानिक विरोधक एकवटले

» सुनील आढाव।
adhavmac@gmail.com

।पिंपरी-चिंचवड ।

**भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांची शिंदे-फडणवीस सरकारमधील मंत्रीमंडळ विस्तारात वर्णी लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड शहराच्या इतिहासात पहिल्यांदा मंत्रीपद मिळणार असून, त्यामुळे प्रस्थापितांची राजकीय असुरक्षितता वाढली आहे. परिणामी, लांडगे यांना मंत्रीपद मिळू नये, या करिता सर्वपक्षीय विरोधक एकवटले आहेत.**





भामा आसखेड प्रकल्पाच्या 'जॅकवेल' च्या कामावरुन राष्ट्रवादीसह सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांनी प्रशासनासह अप्रत्यक्षपणे महेश लांडगे यांना 'टार्गेट' केले जात आहे. यामागील मूळ कारण, "पॉलिटिकल इनसिक्युअरीटी" असून, लांडगे मंत्री झाले, तर अनेकांच्या राजकीय कारकीर्दीला सुरुंग लागणार आहे.

वास्तविक, सुरुवातीच्या काळात नेत्यांच्या सतरंजा उचलण्यापासून २५ वर्षे महेश लांडगे यांनी संघर्ष केला आहे. पहिल्यादा तिकीट मिळण्यासाठी २००२ साली तत्कालीन दिग्गजांचे उंबरे झिजवावे लागले. पहिल्या निवडणुकीत अपयश चाखावे लागले. त्यानंतर पुन्हा पोटनिवडणूक लढवली. २००४ ते २०१४ असे महापालिकेत नगरसेवक, स्थायी समिती सभापती असे काम केले. त्यानंतर २०१४ मध्ये सर्व प्रस्थापित पक्षांनी तिकीट नाकारले असताना 'अपक्ष' विधानसभा लढवली आणि जिंकली. २०१७ मध्ये भाजपात प्रवेश आणि २०१९ मध्ये भाजपाच्या तिकीटावर पुन्हा विधानसभेत धडक दिली. २०१७ मध्ये पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाला महापालिकेत यश मिळाले. त्यात लांडगे यांचा मोलाचा वाटा आहे. या संघर्षमय प्रवास यशस्वी झाला. कारण, लोकांसाठी त्यांनी वेळ दिला आणि लोकांसाठी काम केले. अन्यथा लांडगे यांना चिरडून टाकण्यासारखी मातब्बर मंडळी शहराच्या राजकारणात होती.

*आजच्या घडीला आमदार महेश लांडगे शहराचे "कारभारी" आहेत. असा 'पालक' जो स्वत:च्या कर्तुत्वावर आणि हिंमतीवर शहराचे नेतृत्व करीत आहे. बलाढ्य विरोधकांसमोर शहराची आणि पिंपरी-चिंचवडकरांच्या हिताची भूमिका मांडत असतो. मग, नवनगर विकास प्राधिकरणाचे विलीनिकरण असो किंवा भूमिपुत्रांच्या समस्यांना प्राधान्य असो. पिंपरी-चिंचवडकरांच्या हक्काच्या लढाईल महेश लांडगे कायम अग्रभागी राहिले आहेत. एखाद्या मंत्र्याला लाजवेल असे कार्य... प्रशस्त कार्यालय, बॅक ऑफीसमध्ये काम करणारी अनुभवी लोकांची यंत्रणा, प्रत्येक प्रकल्प नेटका आणि शहराच्या लौकीकात भर घालणारा... मग, तो छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा असलेला "स्टॅच्यू ऑफ हिंदूभूषण" असो किंवा आंतरराष्ट्रीय दर्जाचे कबड्डी आणि कुस्ती संकूल असो...*

भारतातील सर्वांत मोठी रिव्हर सायक्लोथॉन असो किंवा सर्वांत ब्रॅंड बैलगाडा शर्यत असो... आणि भव्य इंद्रायणी थडी.. प्रत्येक उपक्रम ' मेगा इव्हेंट' होतो आणि पिंपरी-चिंचवडच्या वैभवात भर घालतो. ही कार्यक्षमता असलेला एकही नेता पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात सध्यस्थितीला नाही, हे मोठ्या मनाने मान्य केले पाहिजे.

तरुणांची प्रचंड क्रेझ... अबालवृद्धांसाठी 'इजी टू अवेलेबल' असलेले आमदार महेश लांडगे नैसर्गिक आपत्तीच्या काळात पश्चिम महाराष्ट्र आणि कोकणातही धावून जातात. हा मोठेपणा सहज आलेला नाही लोकांमध्ये राहुन लोकांसाठी काम करणारा हा नेता पिंपरी-चिंचवड शहराचे 'भविष्य' आहे. कारण, एखादा प्रगल्भ नेता तयार व्हायला किमान 20 ते 25 वर्षांचा कालावधी लागतो. कै. अण्णासाहेब मगर, शरद पवार, अजित पवार यांच्यानंतर शहराचा नेता कोण? असा प्रश्न उपस्थित केला असता. आजच्या घडीला आमदार लक्ष्मण जगताप आणि महेश लांडगे हीच नावे समोर येतात.

***आता जगताप यांची प्रकृती ठिक नाही. त्यामुळे शहराचे 'कारभारी' एका अर्थाने महेश लांडगे आहेत. परंतु, जगताप यांचे बंधू शंकर जगताप यांच्या सोबतीने लांडगे शहराचा आणि भाजपाचा गाडा हाकत आहेत, ही राजकीय प्रगल्भता लक्षात घेतली पाहिजे. अन्यथा "वाघ एकला राजा..बाकी खेळ माकडांचा" अशी जनभावना झाल्याखेरीज राहणार नाही.***

### महेश लांडगेंमुळेच शहराचा स्वाभीमान टिकला...

महाविकास आघाडीची सत्ता आल्यानंतर २० ते २५ नगरसेवक राष्ट्रवादीच्या संपर्कात गेले. मातब्बर नेत्यांनी राष्ट्रवादीसमोर अक्षरश: गुडघे टेकले, हे संपूर्ण शहराने उघड्या डोळ्यांनी पाहिजे. महाविकास आघाडीसह पक्षांतर्गत विरोधकांचे राजकीय हल्ले होत असताना मात्र महेश लांडगे यांनी स्वाभीमान सोडला नाही. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात लांडगे यांनी एकाकी झुंज दिली. भाजपाची राज्यात सत्ता नसतानाही पक्ष फुटीच्या उंबरठ्यावर असताना संयम बाळगला. त्याची पोहोचपावती मंत्रीमंडळ विस्तारात मिळेल. पण, लांडगेंचे नेतृत्व मोठे होत आहे म्हणून राजकीय असुयेपोटी आरोप करण्यामुळे पिंपरी-चिंचवडची अपरिमित हानी होणार आहे, ही बाब सर्वपक्षीय नेत्यांनी लक्षात घेतली पाहिजे.

### "पॉलिटिक्स वुईथ रिस्पेक्ट" चा शहरात 'खून'

तापट आणि तितकाच भयंकर स्वभाव अशी महेश लांडगे यांची एकेकाळी ओळख. मात्र, सामाजिक क्षेत्रात काम करीत असताना राजकारणात सुसंस्कृतपणा असला पाहिजे म्हणून महेश लांडगे यांनी आपल्या व्यक्तीमत्वात प्रचंड बदल केला. 'पॉलिटिक्स वुईथ रिस्पेट' ही संकल्पाना राबवली. त्याला खरे उतरत आतापर्यंत महेश लांडगे यांनी कुठल्याही नेत्यांवर टिका केलेली ऐकीवात नाही. याला अपवाद असेलही मात्र, निराधार टीका करुन खोटी प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न मुळीच केला नाही. हे शहरातील सर्वसामान्य नागरिकांनी उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे. मात्र, राजकीय असुयेपोटी महेश लांडगे कायम टिकेचे धनी ठरले आहेत. आतापर्यंत केलेला एकही आरोप सिद्ध करता आला नाही, ही विरोधकांची शोकांतिका आहे. यातून वेळीच बोध घेतला पाहिजे. कारण, माजी आमदार ज्ञानेश्वर लांडगे, विलास लांडे, आमदार लक्ष्मण जगताप, अण्णा बनसोडे यांना क्षमता असतानाही मंत्रीमंडळात स्थान मिळाले नाही. आता आमदार महेश लांडगे यांचेही नेतृत्व स्थानिक कुरघोड्यांच्या राजकारणात संपवणार आहोत का? याचे आत्मचिंतन स्थानिक नेत्यांची करणे अपेक्षीत आहे.

# मनोरुग्णालयाच्या जागेवरील बेकायदा झोपड्या हटविण्याचे आदेश

राज्याच्या अपर मुख्य सचिवांनी दिले आदेश

पुणे ।महाईन्यूज।

येरवड्यातील मनोरुग्णालयाच्या जागेवरील बेकायदा झोपड्या हटविण्यात याव्यात आणि सेवानिवृत्तीनंतरही शासकीय वसाहतीमध्ये राहत असलेल्या कर्मचाऱ्यांकडून वसाहतीतील खोल्या ताब्यात घ्याव्यात, असे आदेश राज्याच्या अपर मुख्य सचिवांनी दिले आहेत.राज्याचे अपर मुख्य सचिवांनी मंगळवारी मनोरुग्णालयाला भेट दिली. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची बैठकी घेतली. त्या वेळी त्यांनी हे आदेश दिले. रुग्णालयाच्या १५६ एकर क्षेत्रावर झालेली अतिक्रमणे आणि अन्य सुविधांसाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. रुग्णालयाच्या मागील बाजूस असलेली अकराशे मीटर लांबीची सीमाभिंत बांधणे, रुग्णालयाच्या आवारात कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी बायोगॅस प्रकल्प सुरू ठेवणे, मोकळ्या जागेवर अतिक्रमण करून बांधलेल्या तीनशे झोपड्या हटविणे, राडारोडा उचलण्याची सूचना महापालिकेला करण्यात आली. सेवकांसाठी बांधलेल्या खोल्यांमध्ये काही कर्मचारी सेवानिवृत्तीनंतरही वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून खोल्या ताब्यात घ्याव्यात, अशी सूचनाही महापालिका प्रशासनाला करण्यात आली.



## पाणीपुरवठा विभागातील भ्रष्टाचाराविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे पिंपरी-चिंचवड महापालिकेत आंदोलन

### पाणीपुरवठा विभागप्रमुखांना घालण्यात आला घेराव

पिंपरी-चिंचवड ।महाईन्यूज



भामा-आसखेड धरणातून पाणी उचलण्यासाठी बांधण्यात येणार्या जॅकवेलच्या कामात तब्बल ३० कोटी रूपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत पिंपरी शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने पालिका आयुक्तांच्या कार्यालयाबाहेर ठिय्या आंदोलन करण्यात आले. तसेच, पाणीपुरवठा विभागप्रमुखांना घेराव घालण्यात आला. राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिला शहराध्यक्षा कविता आल्हाट, युवक अध्यक्ष इम्रान शेख, माजी नगरसेवक नाना काटे, मयूर कलाटे, राहुल भोसले, विक्रांत लांडे, पंकज भालेकर, प्रशांत शितोळे, श्याम लांडे, विनोद नढे, सतीश दरेकर, विनायक रणसुभे आदी पदाधिकारी सहभागी झाले होते. 'प्रशासकीय राजवट हटवा, पिंपरी-चिंचवड वाचवा' अशा विविध घोषणांनी पालिका भवन दणाणून सोडले होते.

यासंदर्भात अजित गव्हाणे म्हणाले, भामा-आसखेड धरणातून पाणी उचलण्यासाठी बांधण्यात येणाऱ्या जॅकवेलच्या कामाची मूळ निविदा १२१ कोटी रुपयांची असताना, १५१ कोटी रुपयांची निविदा सादर करणाऱ्या ठेकेदाराला हे काम देण्याचा घाट पालिका प्रशासनाने घातला आहे. राज्यातील सत्तेच्या जोरावर भाजप नेत्यांनी पालिका प्रशासनाशी संगनमत केले असून पालिकेची आर्थिक लूट सुरू आहे. आयुक्त शेखर सिंह यांनी ही निविदा त्वरीत रद्द करावी, अशी मागणी केल्याचे गव्हाणे यांनी सांगितले.

## सदाभाऊ खोत यांची जीभ घसरली

पुणे ।महाईन्यूज।



गेल्या काही दिवसांपासून राजकीय नेत्यांकडून वादग्रस्त विधाने केली जात आहेत. त्यात आता सदाभाऊ खोत यांचीही भर पडली आहे. राज्यकर्ते म्हणजे रेड्यांची अवलाद असतात. राज्यकर्त्यांना बोलायला लावायचे असेल तर आपल्याला ज्ञानेश्वरांसारखे त्या रेड्याच्या पाठीवर हात ठेवावा लागेल, असे विधान खोत यांनी गुरुवारी केले. पुण्यातील नवी पेठेतील पत्रकार संघात वास्तव कट्टा आणि अर्हम फाउंडेशन यांच्या वतीने स्पर्धा परीक्षार्थींसह संवाद कार्यक्रमात खोत बोलत होते. माजी मंत्री आमदार बच्चू कडू,आमदार गोपीचंद पडळकर, आमदार निरंजन डावखरे, आमदार अभिमन्यू पवार या वेळी उपस्थित होते. खोत म्हणाले, दरवर्षी राज्यव्यापी विद्यार्थी अधिवेशन आयोजित केले पाहिजे. त्याचा फायदा होईल. राज्यकर्त्यांना सर्वांत जास्त भीत डोक्यांची वाटते. जिकडे जास्त डोकी, तिकड जास्त राज्यकर्ते बोलतात. कारण राज्यकर्ते हे एक रेड्याची औलाद आहे.

राज्यकर्त्यांना बोलायला लावायचे असेल तर आपल्याला ज्ञानेश्वरांसारखे त्या रेड्याच्या पाठीवर हात ठेवावा लागेल, कारण त्यांच्या पाठीवर हात ठेवल्याशिवाय ते वेद बोलत नाही.

# पुणे- मुंबई द्रुतगती महामार्गावर 'रस्ता सुरक्षा अभियान'

## महामार्गावर आरटीओ, पोलीस असणार 24 तास ऑन ड्युटी

पुणे ।महाईन्यूज।

पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर आजपासून रस्ता सुरक्षा अभियान राबवलं जात आहे. आरटीओ अधिकारी, कर्मचारी आणि महामार्ग पोलिसांची १२ पथकं जुना आणि यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर कार्यरत असणार आहेत. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी आणि वाहनचालकांना शिस्त लागावी म्हणून हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती उप परिवहन आयुक्त (रस्ता सुरक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई चे भरत कळसकर



ह्यांनी दिली आहे. ते मावळमध्ये प्रसारमध्यमांशी बोलत होते. हा उपक्रम पुढील सहा महिने सुरू राहणार असून यातून अनेक चालक सुधारतील अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे. भरत कळसकर म्हणाले की, आजपासून मोटार वाहन विभाग आणि महामार्ग

### हे नियम तोडल्यास होणार कडक कारवाई

- पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर अवैधरित्या पार्किंग केल्यास कारवाई होणार,
- वाहतूक अडथळा झाल्यास देखील कारवाई होणार,
- ओव्हर स्पीड असलेल्या वाहनांवर कारवाई केली जाणार,
- उजव्या मार्गिकेतून ट्रक, बस कंटेनर आदी कमी वेगात चालणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जाणार
- विना सीटबेल्ट प्रवास करणाऱ्या वाहनचालकांवर कारवाई

पोलिस यांच्याकडून रस्ता सुरक्षा उपक्रम राबवला जात आहे. आरटीओ आणि महामार्गचे एकूण ३० अधिकारी जुना महामार्ग आणि पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर कार्यरत राहणार आहेत. दोन्ही रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. ८० टक्के वाहनचालक नियम पाळत नसल्याने अपघातात होतात. २०२१ मध्ये २०० अपघात झाले असून ८८ जणांना जीव गमवावा लागला आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे. पुढे ते म्हणाले की, पहिले सात दिवस जनजागृती करणार आहोत. मग पुढे कारवाई केली जाणार आहे. लेन कटिंग, ओव्हर स्पीड, सीट बेल्ट यासह इतर नियम न पाळणाऱ्या वाहनचलकांवर १२ पथक २४ तास करडी नजर ठेवून असणार आहेत अस देखील त्यांनी म्हटलं आहे.

# पाणीटंचाईची उच्च न्यायालयाकडून गंभीर दखल!

## स्थानिक स्वराज्य संस्थांना 13 डिसेंबरपर्यंत प्रतिज्ञापत्र देण्याचे आदेश

पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखाली असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे.**

पुणे, पिंपरी-चिंचवड, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, जिल्हा परिषद आणि अन्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखाली असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांना पाणीटंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याची गंभीर दखल मुंबई उच्च न्यायालयाने घेतली आहे. राज्य सरकार, पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तसेच जिल्हा परिषदेला स्वतंत्र आणि तपशीलवार प्रमाणपत्र येत्या १३ डिसेंबरपर्यंत सादर करण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार २०१६ मध्ये स्थापन झालेल्या पाणी निवारण समितीच्या कामकाजाचा अहवालाही सादर करण्यास न्यायालयाने स्पष्ट केले असून पाणी समस्येची तीव्रता आणि निकड लक्षात घेऊन पंधरा डिसेंबर रोजी जनहित याचिकेवर प्राधान्याने सुनावणी होणार आहे.

जिल्ह्यातील पाणीटंचाई संदर्भात पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील अनेक संघटनांनी एकत्र येत मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली आहे. वाघोली हाउसिंग सोसायटी असोसिएशन, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट फेडरेशन, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, पिंपरी-चिंचवड सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्यादित, बाणेर-पाषाण लिंक रोड वेलफेअर ट्रस्ट, बालेवाडी रेसिडेन्सी को-ऑपरेटिव्ह हाउसिंग वेलफेअर फेडरेशन लिमिटेड, डिअर सोसायटी वेलफेअर असोसिएशन, बावधन सिटीझन्स फोरम, हिंजवडी एम्प्लॉइज अॅण्ड रेसिडन्ट्स ट्रस्ट, औंध विकास मंडळ, असोसिएशन ऑफ नगर रोड सिटीझन फोरम या संस्थांनी अॅड. सत्या मुळे यांच्या मार्फत याचिका दाखल केली आहे. केंद्र सरकार, केंद्रीय भूजल मंडळ, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरण, पुणे महापालिका, पिंपरी-चिंचवड महापालिका, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण आणि जिल्हा परिषद यांच्याविरोधात ही याचिका आहे.पुणे: प्रादेशिक परिवहन कार्यालयातील महिला अधिकाऱ्याला धक्काबुक्की; पसार झालेला आरोपी दोन महिन्यांनी अटकेत.

गेल्या तीन ते चार वर्षांपासून मुबलक प्रमाणात पाऊस होऊनही जिल्हा आणि शहरी भागातील रहिवाशांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यासंदर्भात स्थानिक स्वयंसेवी संस्था आणि रहिवासी संघटनांनी स्थानिक प्राधिकरणाबरोबर बैठका घेतल्या, निवेदनेही दिली आहेत. मात्र पाणीपुरवठ्यात कोणतीही सुधारणा झालेली नाही. विंधन विहिरींद्वारे पाणी उपसा करण्यासाठी संरक्षण आणि नियमन करण्याचे कोणतेही धोरण नाही. कृत्रिम पाणीटंचाई करून पाणी विकत घेण्यास भाग पाडले जात आहे. त्यामुळे जलवाहिनी द्वारे किंवा अन्य कोणत्याही पर्यायी




**धरणे शंभर टक्के भरली असताना नळातून आणि जलवाहिन्यातून पाणी रहिवाशांपर्यंत पोहोचत नाही. मात्र खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा होतो. बाणेर, बालेवाडी, वाघोली, हिंजवडी आणि अन्य परिसरात दिवसातून पंधरा मिनिटेही पाणीपुरवठा होत नाही, ही बाब अॅड. सत्या मुळे यांनी मुख्य न्यायाधीश दीपंकर दत्ता आणि न्यायमूर्ती अभय अहुजा यांच्या अध्यक्षतेखालील विभागीय खंडपीठाच्या निदर्शनास आणून दिली.**

**पाणी समस्येसंदर्भात यापूर्वी दाखल याचिकेवरील सुनावणी वेळी उच्च न्यायालयाने जिल्ह्यासाठी समिती स्थापन करण्याचे आदेश दिले होते. या समितीने दर दोन महिन्यांनी एकदा बैठक घ्यावी, असेही न्यायालयाने स्पष्ट केले होते. मात्र अशी समिती स्थापन झाली आहे की नाही, याची माहिती नाही, या मुद्द्याकडेही अॅड. सत्या मुळे यांनी लक्ष वेधले. त्यानुसार समितीच्या कामकाजाचा सविस्तर अहवाल ठेवण्याचे आदेशही न्यायालयाने दिले.**

# बैलगाडा शर्यतींचा मार्ग मोकळा; पशुधन अधिकारी घेणार निर्णय

पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**राज्य सरकारने लम्पी त्वचा रोगाचा संसर्ग रोखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या होत्या. त्याचाच एक भाग म्हणून बैलांच्या शर्यतींवर बंदी घातली होती. ही बंदी शिथिल करण्यात आली आहे. पुण्यात संबंधित तालुक्याच्या पंचायत समितीच्या पशुधन विकास अधिकाऱ्याने लम्पी त्वचा रोगाचा आढावा घेऊन शर्यतींना परवानगी देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी दिले आहेत.**



‘लक्ष्मी नारायण राजयोग’ तयार झाल्याने ‘या’ राशींचे भाग्य चमकणार? २०२२ च्या शेवटी मिळेल प्रचंड धनलाभाची संधी राज्याच्या पशुसंवर्धन विभागाने स्थानिक पातळीवर लम्पी त्वचा रोगाचा आढावा घेऊन जनावरांचा बाजार आणि शर्यतींना परवानगी देण्याचे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी पुणे जिल्ह्यातील उपविभागीय अधिकाऱ्यांना त्यांच्या उपविभागाच्या कार्यक्षेत्रामध्ये बैलगाड्यांचे शर्यतीस परवानगी देण्याबाबत अधिकार दिलेले आहेत. जिल्ह्यातील सर्व संबंधित उपविभागीय अधिकारी यांनी कोणताही जनावरांचा बाजार भरवणे तसेच प्राण्यांच्या शर्यतीस परवानगी देण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करावी, असेही आदेशात म्हटले आहे.

# पुणे- मुंबई द्रुतगती महामार्गावर ‘रस्ता सुरक्षा अभियान’

## आरटीओ, पोलीस असणार 24 तास ऑन ड्युटी

पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।



पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर आजपासून रस्ता सुरक्षा अभियान राबवलं जात आहे. आरटीओ अधिकारी, कर्मचारी आणि महामार्ग पोलिसांची १२ पथकं जुना आणि यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर कार्यरत असणार आहेत. पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघात रोखण्यासाठी आणि वाहनचालकांना शिस्त लागावी म्हणून हा उपक्रम राबवला जात असल्याची माहिती उप परिवहन आयुक्त (रस्ता सुरक्षा) महाराष्ट्र राज्य, मुंबई चे भरत कळसकर ह्यांनी दिली आहे. ते मावळमध्ये प्रसारमध्यमांशी बोलत होते. हा उपक्रम पुढील सहा महिने सुरू राहणार असून यातून अनेक चालक सुधारतील अशी अपेक्षा देखील त्यांनी व्यक्त केली आहे.

भरत कळसकर म्हणाले की, आजपासून मोटार वाहन विभाग आणि महामार्ग पोलिस यांच्याकडून रस्ता सुरक्षा उपक्रम राबवला जात आहे. आरटीओ आणि महामार्गचे एकूण ३० अधिकारी जुना महामार्ग आणि पुणे- मुंबई द्रुतगती मार्गावर कार्यरत राहणार आहेत. दोन्ही रस्त्यावरील अपघात कमी करण्यासाठी हा उपक्रम राबवला जात आहे. ८० टक्के वाहनचालक नियम पाळत नसल्याने अपघातात होतात. २०२१ मध्ये २०० अपघात झाले असून ८८ जणांना जीव गमवावा लागला आहे, अशी माहिती त्यांनी दिली आहे.

## संपादकीय »

# मानवकेंद्रित जागतिकीकरणाकडे...

***भारताचा 'जी-२०' अध्यक्षपदाचा कार्यकाळ हा परिस्थिती सुधारणारा, सुसंवाद निर्माण करणारा आणि आशादायक बनवण्यासाठी आपण एकत्र येऊ या. एका नव्या आदर्शाला आकार देण्यासाठी मिळून काम करू या... जी-२० अध्यक्षपद भारताकडे आले असून, त्याचा कार्यकाळ आजपासून सुरू होत आहे. त्यानिमित्त.***

जी-२० समूहाच्या या आधीच्या १७ अध्यक्ष देशांनी अतिशय लक्षणीय असे काम केले आहे. जागतिक स्थूल-आर्थिक स्थैर्य मिळवण्यासाठी, आंतरराष्ट्रीय कररचनेचे सुसूत्रीकरण करण्यासाठी, देशांवर असलेले कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी त्यांनी बजावलेली कामगिरी लक्षणीय आहे. या सगळ्याचा आपल्याला लाभ होणार आहेच; त्यांच्या आधारावरच आपल्याला भविष्याची उभारणी करायची आहे. मात्र, जेव्हा भारत आज एक महत्त्वाची जबाबदारी घेत आहे, त्यावेळी मी माझ्या मनाला विचारतो- आज जी-२० जिथे आहे, त्याच्या पलीकडे जाऊ शकेल का? मानसिकतेत एक मूलभूत परिवर्तन करण्यासाठी आपण उत्प्रेरक ठरु शकू का? ते परिवर्तन म्हणजे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा विचार करणे. मला असा विश्वास वाटतो, की आपण हे करु शकतो. आपली मानसिकता आजूबाजूच्या परिस्थितीनुसार बनत असते. जागतिक इतिहासात मानवतेकडे दुर्लक्ष केले गेले. आपण,सर्वजण मर्यादित संसाधनांसाठी भांडले. कारण इतरांना ती न मिळू देण्यात, ती नाकारण्यावर आपले अस्तित्व अवलंबून होते. आपल्या कल्पना, आदर्श आणि ओळख- यांमधील संघर्ष आणि स्पर्धा- ही एक पद्धत बनून गेली आहे. दुर्दैवाने, आजही आपण त्याच जुन्या शून्य बेरजेच्या मानसिकतेत अडकलो आहोत. आजही अनेक देश, प्रदेश किंवा संसाधनांसाठी लढाया करतात. आपण पाहतो की, जीवनावश्यक वस्तूंच्या पुरवठ्याचा वापर एखाद्या शस्त्रासारखा केला जातो. आपण हे बघतो, जेव्हा, कोट्यवधी लोकांना धोका असूनही, लसींचा साठा केला जातो.

कदाचित काही लोक असाही युक्तिवाद करतील, की संघर्ष आणि लोभ, या मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ती आहेत. पण मी याच्याशी असहमत आहे. जर मानव सुरुवातीपासून स्वार्थी प्रवृत्तीचा असेल, तर, मग 'एकत्व' या मूलभूत तत्त्वाचा उपदेश करणाऱ्या ज्या अनेक आध्यात्मिक परंपरांनी आपला चिरस्थायी ठसा समाजावर उमटवला आहे, त्यांचा अर्थ काय समजायचा, हे कोणी स्पष्ट करेल का? अशीच एक परंपरा, जी भारतात लोकप्रिय आहे, त्यात सर्व सजीव प्राणीमात्र आणि एवढेच नाही, तर अगदी निर्जीव गोष्टीसुद्धा पंचमहाभूतात सामावलेल्या आहेत, असा विचार मांडला आहे.- ती पंचमहाभूते म्हणजे पांच तत्त्वे आहेत- पृथ्वी, आप, तेज, वायू आणि अवकाश. या सर्व घटकांमधील सौहार्द आपल्यामध्ये आहे .

# शाळा वाचवा; मुले शिकवा




गेले काही दिवस कमी पटसंख्येच्या शाळा सरकार बंद करणार अशा बातम्या येत आहे. हा सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा विषय आहे. पण तो इतर गदारोळात दुर्लक्षित राहतो आहे. तीन डिसेंबर २०१७ रोजी तेव्हाचे शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी दहापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या चार हजार ९३ प्राथमिक शाळा बंद होणार असल्याचे जाहीर केले. या शाळांतील मुले अन्य शाळांमध्ये जाणार होती. तोच निर्णय आताचे सरकार अमलात आणते आहे. यात अनेक शाळा व विद्यार्थी दुर्गम व मागास पाडे, वस्त्यांवरील आहेत. त्यामुळे, या विद्यार्थ्यांची पुन्हा गळती व ती शाळाबाह्य होण्याची शक्यता आहे. अशा शाळांमधील विद्यार्थी आणि पालक धास्तावले असून आमची शाळा बंद करू नका, अशी हाक विद्यार्थी व पालक तसेच ६५ विविध संघटना व शिक्षणतज्ज्ञ देत आहेत. नुकतीच इगतपुरीजवळ दरेवाडी येथे एका शाळेतील ४० शालेय विद्यार्थी दप्तरे घेऊन रस्त्यावर बसली आणि त्यांनी सरकारला 'आमची वह्यापुस्तके घ्या आणि आम्हाला शेळ्या द्या. त्यांना चारून आम्ही पोट भरू', असे सांगत निदर्शने केली. खरे म्हणजे, शिक्षण जितके तळागाळात पोहोचेल; तितकी विकासाची प्रकिया बळकट होते, पण इथे सरकारच्या या धोरणात सरकारी शाळांमध्ये गरिबांची, श्रमिकांची, सामाजिकदृष्ट्या पिछाडीस असलेल्या समाजातील मुले पोळून निघतात. अशा निर्णयातून सरकार तसेच धोरणकर्त्यांची बेदरकार भूमिका दिसते. वास्तविक, शिक्षण हक्क कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, यासंदर्भात यापूर्वी अनेक व्यासपीठांवर अनेक चर्चासत्रे सन २००९ पासून झाली. त्यात शासन व शिक्षण खात्यातील मान्यवर आणि मोठमोठ्या स्वयंसेवी संस्था सहभागी झाल्या. आजवर अनेक संशोधनातून हे अनेकदा समोर आले की वंचित व कमकुवत गटांतील मुलांना शाळेत नेणे हे व्यवस्थेसमोरचे मोठे आव्हान आहे. या मुलांमध्ये दलित, आदिवासी, अल्पसंख्याक मुले व विशेषतः मुली आहेत. त्यांच्या शिक्षणाचे आव्हान पेलण्यासाठी खरेतर शाळाच त्यांच्यापर्यंत नेणे आवश्यक



आहे. महाराष्ट्र सरकारच्या 'बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११' या राजपत्रानुसार सर्व बालकांना मोफत शिक्षण मिळवण्याचा अधिकार आहे. याच कायद्याच्या भाग तीन कलाम सहा-क नुसार 'इयत्ता पहिली ते पाचवी यात शिकणाऱ्या बालकांबाबत वस्तीनजीक एक किलोमीटर या चालत जाण्यायोग्य अंतराच्या आत आणि ६ ते ११ वर्षे वयोगटातील किमान वीस बालके असतील, तेथे शाळा सुरू केली जाईल,' असे म्हटले आहे. शिवाय, याच कायद्याच्या क्रमांक ३.२ नुसार 'डोंगराळ क्षेत्रात किंवा दुर्गम क्षेत्रांत राज्य शासनास पोट नियम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किमान अंतरात यथायोग्य बदल करता येईल, असेही म्हटले आहे. यातून या कायद्यातील घरापासून शाळेचे अंतर आणि अन्य गोष्टींमध्ये सकारात्मक लवचिकतेला जागा आहे. हीच लवचिकता पटसंख्येबाबत हवी. यानंतर या कायद्याच्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी कृतिकार्यक्रम बनवण्यासाठी अनेक संयुक्त कार्यशाळा शिक्षण खात्याने घेतल्या. आणि असे असूनही आता हे सर्व उफराटे निर्णय सरकार का घेते आहे? ज्या दुर्गम भागात मोठ्या प्रयत्नांनी शाळा सुरू झाल्या होत्या; त्यांचा दर्जा व पटसंख्या सुधारण्याचे कार्यक्रम हाती घेण्याऐवजी कमी पटसंख्येचे कारण दाखवून मुलामुलींना दूरच्या शाळांमध्ये दाखल करण्याचे निर्णय घेतले जात आहेत. हे खरोखर भयंकर आहे. यामुळे बरीचशी मुले शाळेबाहेर फेकली जाणार हे उघड आहे. वयाने लहान असलेल्या बालकांना एक ते दीड किलोमीटर लांब असलेल्या शाळेत स्वतः जाणे अथवा गरीब, श्रमिक किंवा हातावर पोट असणाऱ्या पालकांना मुलांना शाळेत नेणे व आणणे शक्य तरी होईल का? हे कसले सरकार आहे जे पैसे नसल्याचे कारण सांगून असे निर्णय घेते आहे? दुसरीकडे बुलेट ट्रेन, हायपरलूप, मेट्रो, समृद्धी महामार्ग यांच्यासारखे प्रकल्प प्राधान्यक्रमात कोट्यवधी रुपये खर्चून अंमलात आणताना पैसा कमी पडत नाही. म्हणजे विकासाच्या नावाखाली केवळ वंचितांचे नाही तर देशाचेही भवितव्य टांगणीला लावले जाते आहे. हे खरोखर न समजणारे आहे.

# मानवकल्याणासाठी एकत्र येऊ या..

**भारत जी-ट्वेंटीचे अध्यक्षपद भूषविताना सार्वत्रिक एकत्वाची भावना अधिक दृढ करण्यासाठी प्रयत्न करेल. म्हणूनच 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' अशी संकल्पना निश्चित करण्यात आली आहे..**

'जी-ट्वेंटी' समूहाचे अध्यक्षपद याआधी १७ देशांनी भूषविले. त्या सर्वांनीच आर्थिक स्थैर्यासाठी, आंतरराष्ट्रीय कररचनेच्या सुसूत्रीकरणासाठी, विविध देशांवर असलेले कर्जाचे ओझे कमी करण्यासाठी लक्षणीय योगदान दिले आहे. त्यांच्या या योगदानाचा आपल्याला लाभ होणार आहेच, त्यांच्या आधारावरच आपल्याला भविष्याची उभारणी करायची आहे.

आज भारत ही एक महत्त्वाची जबाबदारी स्वीकारत असताना, माझ्या मनात प्रश्न आहे की, जी-ट्वेंटी आज जिथे आहे, तिथून आणखी पुढे जाऊ शकेल का? मानसिकतेत मूलभूत परिवर्तन घडवून आणण्याच्या प्रक्रियेला आपण गती देऊ शकतो का? असे परिवर्तन जे अवघ्या मानवतेच्या कल्याणाचा विचार करेल..

आपण हे करू शकतो, असा मला विश्वास वाटतो. आपली मानसिकता आजूबाजूच्या परिस्थितीनुसार आकार



घेते. आजवरच्या इतिहासात मानव नेहमीच दुर्भिक्षांचा सामना करत आला आहे. आपण, मर्यादित संसाधनांसाठी भांडलो, कारण इतरांना ती न मिळू देण्यावर, ती नाकारण्यावरच आपले अस्तित्व अवलंबून होते. कल्पना, आदर्श आणि ओळख यांमधील संघर्ष आणि स्पर्धा हा एक नियमच होऊन गेला आहे. आजही आपण त्याच जुन्या मानसिकतेत अडकलो आहोत. आजही भूप्रदेशासाठी किंवा संसाधनांसाठी अनेक देश परस्परांशी लढताना दिसतात. जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा हा प्रश्न एखाद्या शस्त्रासारखा वापरला जाताना दिसतो. कोट्यवधी लोक साथीच्या सावटाखाली वावरत असतानाही लशींची साठेबाजी केली जात असल्याचे दिसते.

कदाचित असाही युक्तिवाद केला जाईल, की संघर्ष आणि लोभ, या मानवाच्या नैसर्गिक प्रवृत्ती आहेत. पण असे म्हणणाऱ्यांशी मी सहमत नाही. मानव सुरुवातीपासून स्वार्थी प्रवृत्तीचा होता, असे मानले तर, मग एकत्व या मूलभूत तत्त्वाचा उपदेश करणाऱ्या ज्या अनेक आध्यात्मिक परंपरांनी आपला चिरस्थायी ठसा समाजावर उमटवला आहे, त्यांचा अर्थ काय? कोणी हे स्पष्ट करेल का?असाच एक विश्वास भारतात रुजला आहे. तो म्हणजे पंचमहाभूतांविषयीचा विश्वास. सर्व सजीव, प्राणिमात्र आणि एवढेच नव्हे, तर अगदी निर्जीव घटकही पंचमहाभूतांचा भाग आहेत. ही पंचमहाभूते म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायू आणि अवकाश ही पंचतत्त्वे आहेत. या सर्व घटकांमध्ये सौहार्द आहे, एकत्व आहे. हेच सौहार्द आपल्यात सामावलेले आहे, परस्परांतही आहे.

## ।। अभंगवाणी ।।



एका जिवें आतां जिणें जालें दोहीं ।
वेगळीक कांहीं नव्हे आतां ॥१॥
नारायणा आम्हां नाहीं वेगळीक ।
पुरविली हे भाक सांभाळिली ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## शॉर्ट न्यूज

### आरपीआयचे माजी जिल्हाध्यक्ष जगदीश गायकवाड यांना अटक

। अलिबाग । महाईन्यूज ।

आरपीआय रायगडचे माजी जिल्हाध्यक्ष आणि पनवेल महानगर पालिकेचे माजी उपमहापौर जगदिश गायकवाड यांना अटक करण्यात आली आहे. कर्जत येथील जबरी मारहाण आणि जीवे ठार धमकी दिल्याच्या प्रकरणात कर्जत पोलीसांनी ही कारवाई केली आहे. अटक करण्यासाठी गेलेल्या पोलीसांवर गाडी घालण्याचा प्रयत्न यावेळी त्यांच्या चालकाकडून करण्यात आला आहे.पण मुंबईच्या सत्र न्यायालयानं त्यांना जामीन देण्यास नकार दिला.

# कर्नाटकनं महाराष्ट्राला पुन्हा डिवचलं!

## जतच्या दुष्काळी भागात सोडलं पाणी



। जत । महाईन्यूज ।

महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद सध्या उफाळून आलेला असताना कर्नाटकनं महाराष्ट्रावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यानुसार, कर्नाटकच्या बोम्मई सरकारनं तुबची बबलेश्वर योजनेतून सांगली जिल्ह्यातील जत या दुष्काळी तालुक्यातील तिकोंडी तलावात पाणी सोडलं आहे.

म्हैसाळ पाणी योजनेचा अहवाल तात्काळ जाहीर करण्याच्या सूचना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना सूचना केली होती. त्यासाठी जिल्हाधिकारी आज सकाळपासून उमदी भागात पाहणी करत आहेत.

आज नेमके जिल्हाधिकारी त्या भागात असतानाच कर्नाटकनं तुबची बबलेश्वरची योजनेमध्ये पाणी सोडलं आहे. या योजनेतून सोडलेलं पाणी कर्नाटकातील गावांनाच जातं. पण ते सीमावर्ती भागातील तिकोंडी तलावातून पुढे जातं. काल संध्याकाळी पाणी सोडल्यानंतर आज दुपारपर्यंत हा तलाव भरला असल्याचं सांगण्यात येत आहे.

दरम्यान, कर्नाटकनं पाणी सोडल्यानं तिकोंडी तलावर भरल्यानं हे पाणी जत तालुक्यातील गावांमधून पुढे गेलेलं आहे. पण नेमकं जिल्हाधिकारी या भागात दौऱ्यावर असताना आणि गेल्याकाही दिवसांपासून सीमाभागाचा प्रश्न ऐरणीवर आलेला असताना कर्नाटककडून हा डिवचण्याचा प्रकार झाला आहे.

## शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणार; विरोधी पक्षांच्या बैठकीत निर्णय

। मुंबई । महाईन्यूज ।

**हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. अधिवेशनाचा कालावधी किमान एक आठवडा इतका वाढवावा. त्यासाठी अधिवेशनाची तारीख आठवडाभर अगोदर घ्यावी. ही मागणी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत केली जाणार आहे.**

मुंबई : हिवाळी अधिवेशनात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा निर्णय विरोधी पक्षांच्या नेत्यांच्या बैठकीत घेण्यात आला. विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी बोलावलेल्या बैठकीला विरोधी शिवसेना, काँग्रेस , शेतकरी कामगार पक्ष, समाजवादी पक्ष, जनता दल संयुक्त आदी पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हिवाळी अधिवेशन १९ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. अधिवेशनाचा कालावधी किमान एक आठवडा इतका वाढवावा. त्यासाठी अधिवेशनाची तारीख आठवडाभर अगोदर घ्यावी. ही मागणी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत केली जाणार आहे. बैठकीला अंबादास दानवे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण व अशोक चव्हाण, राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ, काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, शिवसेना नेते आदित्य ठाकरे उपस्थित होते. अधिवेशन नागपूरमध्ये होत आहे. विदर्भातील समस्यांवर विधिमंडळात चर्चा करून सरकारला दखल घ्यायला भाग पाडले जाणार आहे. या बैठकीनंतर अजित पवार यांनी सांगितले की, अधिवेशनाचा कालावधी वाढवण्यासाठी आणि अधिवेशनात कोणते प्रश्न हाताळायचे यासाठी ही बैठक बोलावली होती.



# निवडणुका आणखी लांबणीवर

## स्थानिक स्वराज्य संस्थांबाबत आता 13 डिसेंबरला सुनावणी



### प्रभागसंख्या प्रक्रिया 'जैसे थे'

**मुंबई : मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी महाविकास आघाडी सरकारने वाढवलेली प्रभागसंख्या २३६ वरून पुन्हा २२७ करण्याबाबत कायदेशीर प्रक्रिया पुढील सुनावणीपर्यंत सुरू करणार नाही, अशी हमी राज्य सरकारने बुधवारी उच्च न्यायालयात दिली. न्यायालयानेही सरकारचे म्हणणे नोंदवून प्रकरणाची सुनावणी २० डिसेंबर रोजी ठेवली. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकांबाबतची स्थिती तूर्त 'जैसे थे' राहणार आहे.**

। मुंबई । महाईन्यूज ।

मुंबई महापालिकेसह राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबतची सर्वोच्च न्यायालयातील सुनावणी आता १३ डिसेंबरपर्यंत लांबणीवर गेली आहे. ती त्या वेळीही न झाल्यास नाताळच्या सुटीनंतर म्हणजे जानेवारीपर्यंत लांबण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणुका आणखी रखडण्याची चिन्हे आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रभागांमध्ये वाढ करण्याचा महाविकास आघाडी सरकारचा निर्णय आणि ती पूर्ववत करण्याचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारचा निर्णय, प्रभाग रचना करण्याचे अधिकार राज्य निवडणूक आयोगाकडून राज्य सरकारकडे घेण्याचा निर्णय आदी विविध मुद्द्यांवर सर्वोच्च न्यायालयात याचिका प्रलंबित आहेत. सरन्यायाधीश डॉ. धनंजय चंद्रचूड आणि न्यायमूर्ती पी.एस. नरसिंह यांच्या खंडपीठापुढे दोन दिवसांपूर्वी त्यावर सुनावणी होणे अपेक्षित होते. पण, त्यावर सुनावणी होऊ शकली नाही आणि आता या याचिकांवर १३ डिसेंबर रोजी सुनावणी ठेवण्यात आली आहे या याचिकांवरील सुनावणी आतापर्यंत अनेकदा लांबणीवर पडली आहे. ती १३ डिसेंबरलाही न झाल्यास नाताळच्या सुटीनंतर म्हणजे नव्या वर्षात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयावर या निवडणुकांचे भवितव्य अवलंबून आहे.

# "पाच कोटी मोजायला गेले होते का?"

## चंद्रकांत खैरेंच्या आरोपाला गुलाबराव पाटलांचं प्रत्युत्तर

। सांगली। महाईन्यूज ।

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह सर्व बंडखोर आमदार आणि भाजपाचे काही नेते अलीकडेच गुवाहाटी दौऱ्यावर गेले होते. या गुवाहाटी दौऱ्यावर ठाकरे गटाचे नेते चंद्रकांत खैरे यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

शिंदे गटातील आमदारांना खूश ठेवण्यासाठी पुन्हा एकदा



गुवाहाटीमध्ये प्रत्येकी पाच कोटी रुपये देण्यात आल्याचा आरोप खैरे यांनी केला. ही सर्व रक्कम बबड्या नावाच्या प्राण्याजवळ गोळा करण्यात आली होती, असंही खैरे म्हणाले. चंद्रकांत खैरेंच्या टीकेला शिंदे गटाचे आमदार आणि पाणी पुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. चंद्रकांत खैरे पाच कोटी रुपये मोजायला आले होते का? असा सवाल गुलाबराव पाटलांनी विचारला. ते मुंबई येथे प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

यावेळी गुलाबराव पाटील म्हणाले की, "ज्यावेळी महाराष्ट्रात सत्तांतर झालं, त्यावेळी आम्ही नवस मागितला होता. जेव्हा महाराष्ट्रात शिवसेना-भाजपाचं सरकार येईल, तेव्हा आम्ही कामाख्या देवीचं दर्शन घेण्यासाठी गुवाहाटीला जाऊ... त्यामुळे आम्ही सगळेजण कामाख्या देवीचं दर्शन घेण्यासाठी गेलो. त्यामुळे जर कुणी म्हणत असेल की, आम्ही पाच कोटी घेतले, तर ते पाच कोटी मोजायला गेले होते का? असा माझा सवाल आहे. पण माणूस ज्या देवाकडे नवस करतो, तो नवस पूर्ण करण्यासाठी जात असतो, अशी आपली पद्धत आहे" असंही पाटील म्हणाले.

# कॉंग्रेसच्याच काळात वाढली गरिबी, मोदींचा हल्लाबोल!

## कॉंग्रेस पक्षाच्या राजवटीत गरिबी मोठ्या प्रमाणावर वाढली

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**कॉंग्रेसच्या गरिबी निर्मूलनाच्या कार्यक्रमावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित करत आरोप केला आहे. कॉंग्रेस पक्षाच्या राजवटीत गरिबी मोठ्या प्रमाणावर वाढली कारण त्यांनी केवळ घोषणाबाजी केली आणि कोणतेही ठोस काम करण्याऐवजी देशाचे नुकसान केले आहे. पंतप्रधान गुजरातमधील छोटा उदयपूर जिल्ह्यातील बोदेली नगर येथे एका सभेला संबोधित करत होते, विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी 5 डिसेंबर रोजी मतदान होणार आहे.**



मोदींनी आरोप केला की, “कॉंग्रेस गेली अनेक दशके फक्त एकच सांगत आहे – गरिबी हटवा. लोकांनी तुम्हाला ते करण्याची सत्ता दिली होती, पण त्यांनी केवळ घोषणाबाजी केली. फक्त आश्वासने दिली आणि जनतेची दिशाभूल केली. यामुळेच कॉंग्रेस सरकारच्या काळात गरिबी वाढली."

पंतप्रधान म्हणाले की, मागील कॉंग्रेस आघाडी सरकारच्या धोरणांमुळे गरीब नागरिक अर्थव्यवस्थेत कोणतीही भूमिका बजावू शकले नाहीत. कॉंग्रेसच्या काळात बँकांचे राष्ट्रीयीकरण झाले असले तरी गरिबांना बँक खाती उघडता आली नाहीत, असे ते म्हणाले. कॉंग्रेसने त्यांच्या सरकारच्या काळात शिक्षण, आरोग्य आणि औद्योगिक क्षेत्रात गरीब, आदिवासी आणि इतर मागासवर्गीय (ओबीसी) समुदायातील लोकांना प्राधान्य दिले नाही, असा दावा पंतप्रधानांनी केला. पंतप्रधानम म्हणाले, “द्रौपदी मुर्मू प्रत्येक आदिवासी कुटुंबाचा आणि प्रत्येक नागरिकाचा अभिमान आहे. मात्र कॉंग्रेसने त्यांच्या उमेदवारीला विरोध केला. त्यांना कोणत्याही आदिवासी महिलेला भारताचे राष्ट्रपती बनवायचे नव्हते. त्यामुळे त्यांच्या विरोधात उमेदवार उभा केला. अन्यथा त्यांची एकमताने निवड झाली असती."

गुजरात विधानसभेच्या एकूण 182 जागांपैकी 89 जागांसाठी गुरुवारी पहिल्या टप्प्यात मतदान होत आहे. उर्वरित 93 जागांसाठी 5 डिसेंबरला दुसऱ्या टप्प्यासाठी मतदान होणार आहे.

# मोदी-शाह सोडवणार महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न?

## दोन्ही मुख्यमंत्र्यांसोबत घेणार बैठक

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

सध्या महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद राज्यात पेटलेला असताना दोन्ही राज्यातील नेत्यांकडून सतत वक्तव्य केली जात आहेत. कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी केलेल्या वक्तव्यानंतर महाराष्ट्रात देखील त्याचे तीव्र पडसाद पाहायला मिळाले. दरम्यान या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत दोन्ही राज्याच्या मुख्यमंत्र्यांची लवकरच बैठक होणार आहे. या बद्दलची माहिती खासदार धैर्यशील माने यांनी दिली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत कर्नाटकचे मुख्यमंत्री बोम्मई आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे या नेत्यांची लवकरच बैठक होणार आहे. त्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे लवकरच त्याचे नियोजन केले जाईल माने यांनी सांगितले. दरम्यान हरीश साळवे हे या प्रकरणात वकील म्हणून काम करतील, तसेच त्यांच्यासोबत अधीक वकील जोडून देत आहेत अशी माहिती देखील खासदार माने यांनी दिली आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन राज्यातील सीमाप्रश्न गेल्या अनेक वर्षांपासून कायम आहे.



# मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्टवरील सर्व्हर डाऊन

**।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।**

देशातील सर्वात मोठ्या एअरपोर्टपैकी एक असलेल्या मुंबई छत्रपती शिवाजी महाराज इंटरनॅशनल एअरपोर्टवरील सर्व्हर अचानक डाऊन झाले आहे, यामुळे मागील 20 मिनिटांपासून चेक इन करताना प्रवाशांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतोय. कॉम्प्युटर सिस्टममध्ये झालेल्या बिघाडामुळे चेक इनसाठी प्रवाशांची गर्दी पाहायला मिळत आहे. नियोजित फ्लाईट्स बुकिंग असतानाही चेक इनसाठी प्रवाशांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. अनेक प्रवाशांनी आता ट्विटर याबाबत तक्रारी केल्या आहेत.

अचानक सर्व्हर डाऊन झाल्याने येथील कॉम्प्युटर सिस्टमही चालत नाहीत, यामुळे आता विमानतळ

### चेक इनसाठी प्रवाशांची गर्दी

प्रशासनाकडून तांत्रिक अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न सुरु आहेत. थोड्याच वेळात ही सिस्टम पुन्हा सुरू होण्याची अपेक्षा आहे.

एअरपोर्टचे सर्व्हर पूर्णपणे डाऊन झाल्यामुळे प्रवासी डेटासंबंधी संपूर्ण काम ठप्प झाले आहे. यामुळे प्रवाशांची तपासणी, बॅगेज काउंटर, चेक इन, बोर्डिंग पास देण्याची सर्व्हिस पूर्णपणे थांबली आहे.

सोशल मीडियावर प्रवाशांच्या तक्रारीनंतर एअर इंडियाने याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. एअर इंडियाने म्हटले की, आम्हाला समजते की, हा विलंब नक्कीच गैरसोयीचा आहे.



# मोफत शिक्षण मग शिष्यवृत्ती कशाला?

## मोदी सरकारने बंद केली अल्पसंख्याकांची शिष्यवृत्ती

**। नवी दिल्ली । महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

इयत्ता पहिली ते आठवी मोफत शिक्षण दिले जाते, असे सांगत मुस्लिम, शिख, पारशी, ख्रिश्चन, जैन आणि बौद्ध या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना केंद्र सरकारकडून देण्यात येणारी शिष्यवृत्ती मोदी सरकारने अचानक बंद केली आहे.

या योजनेअंतर्गत अल्पसंख्याक विद्यार्थांना शिष्यवृत्ती दिली जात होती. प्रती महिना २२५ रुपये तर वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला प्रती महिना ५२५ रुपये वर्षातून १० महिने दिले जात होते. पुस्तके आणि इतर शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी सर्वसाधारण विद्यार्थ्याला वार्षिक ७५० रुपये तर वसतिगृहातील विद्यार्थ्याला वार्षिक १००० रुपये दिले जात होते. दरम्यान पहिली ते आठवीतील विद्यार्थी हे शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत येत असल्याने त्यांना सरकारकडून आधीपासून मोफत शिक्षण पुरवण्यात येते, असे सांगत मोदी सरकारने ही शिष्यवृत्ती बंद केली आहे. ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांनाच फक्त प्री-मॅट्रिक स्कॉलरशीप देण्यात येईल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले.



**सरकारने विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले पण आता ही शिष्यवृत्तीच बंद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील १३ लाख विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे. यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकारवर टीका होत आहे. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, केंद्र सरकार जर ही शिष्यवृत्ती देत नसेल तर राज्य सरकारने या शिष्यवृत्तीसाठी तरतूद करून शिष्यवृत्ती द्यावी. शिष्यवृत्ती प्रश्नी कॉंग्रेस पक्ष हिवाळी अधिवेशनात आवाज उठवेल, असे पटोले यांनी सांगितले.**

सरकारने विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेतले पण आता ही शिष्यवृत्तीच बंद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील १३ लाख विद्यार्थ्यांना याचा फटका बसला आहे. यामुळे पुन्हा एकदा मोदी सरकारवर टीका होत आहे. कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, केंद्र सरकार जर ही शिष्यवृत्ती देत नसेल तर राज्य सरकारने या शिष्यवृत्तीसाठी तरतूद करून शिष्यवृत्ती द्यावी. शिष्यवृत्ती प्रश्नी कॉंग्रेस पक्ष हिवाळी अधिवेशनात आवाज उठवेल, असे पटोले यांनी सांगितले.

महाविकास आघाडीला पायउतार करुन शिंदे-फडणवीस सरकार सत्तेत आले. तेव्हापासून केंद्रातील भाजप सरकारवर व त्यांच्या निर्णयावर टीका करण्याची एकही संधी महाविकास आघाडी सरकारचे नेते सोडत नाही. नगरपालिका व नगरपंचायतींच्या निवडणुकांमुळे शिंदे सरकार व महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये वाक् युद्ध सुरु आहे. मोदी सरकारने मुस्लिम, शिख, पारशी, ख्रिश्चन, जैन आणि बौद्ध या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद केल्याने हिवाळी अधिवेशनात या मुद्द्यावर गदारोळ होण्याची शक्यता आहे.

# दृश्यम २' नंतर अजय देवगणच्या 'सिंघम'ची चर्चा

बॉलिवूड अभिनेता अजय देवगण मुख्य भूमिकेत असलेला 'दृश्यम २' हा चित्रपट १८ नोव्हेंबरला प्रदर्शित झाला. उत्कंठावर्धक कथा, कलाकारांचा दमदार अभिनय, क्लायमेक्स व एकामागोमाग येणारे ट्विस्ट या सगळ्यामुळे हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. 'दृश्यम २'ला प्रेक्षकांकडून भरभरुन प्रेम मिळत आहे. हा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक चित्रपटगृहात गर्दी करत आहेत. 'दृश्यम २'ची बॉक्स ऑफिसवर यशस्वी घौडदोड सुरू असतानाच आता अजय देवगणच्या 'सिंघम' चित्रपटाच्या सिक्वेलसाठी चाहते उत्सुक आहेत. 'सिंघम'चा सिक्वेलही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत. सिनेअभ्यासक तरण आदर्श यांनी त्यांच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन याबाबत माहिती दिली आहे. अजय देवगणचा फोटो पोस्ट करत 'सिंघम' चित्रपटाचा सिक्वेल येणार असल्याचं ते म्हणाले आहेत. अजय देवगण व रोहित शेट्टी सिंघम चित्रपटाच्या सिक्वेलसाठी पुन्हा एकत्र येणार आहेत. अजय देवगण-रोहित शेट्टी यांची यशस्वी जोडी पुन्हा एकत्र येणार आहे. सध्या अजय देवगण भोला चित्रपटाच्या प्रमोशनमध्ये व्यग्र आहे. त्यानंतर आम्ही सिंघमच्या सिक्वेलवर काम सुरू करणार असल्याचं रोहित शेट्टीने सांगितलं आहे", असं तरण आदर्श यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

'सिंघम' चित्रपटाच्या पुढील भागाचं नाव 'सिंघम अगेन' असं असणार आहे. २०११ साली 'सिंघम' हा चित्रपट प्रदर्शित झाला होती. त्यानंतर २०१४ साली या चित्रपटाचा दुसरा भाग 'सिंघम रिटर्न्स' प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. आता या चित्रपटाचा तिसऱ्या भागातून प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यासाठी रोहित शेट्टी व अजय देवगण सज्ज आहेत.





# प्रेम ठरवून करता येत नाही.. - स्वप्नील जोशी

मराठीतील एक दिग्गज आणि लोकप्रिय अभिनेता म्हणून ख्याती असलेला अभिनेता स्वप्नील जोशी, सध्या बराच चर्चेत आहे. मध्यंतरी केलेली पायी वारी असो, 'चला हवा येऊ द्या' मध्ये विशेष भूमिका असो किंवा 'तू तेव्हा तशी' या मालिकेतील सौरभ पटवर्धन. स्वप्नील हा कायमच प्रेक्षकांना भावाला आहे. विशेष म्हणजे यशाच्या इतक्या मोठ्या शिखरावर असूनही तो सर्वांशी आपुलकीने वागताना दिसतो. आज त्याने त्याच्या वैयक्तिक आयुष्याविषयी काही खुलासे केले आहेत.

मराठी चित्रपटसृष्टीतला चॉकलेट बॉय अशी ओळख असलेल्या अभिनेता स्वप्नील जोशी याने लहानपणापासून अभिनय क्षेत्रात काम केले आहे. आजवर त्याने अनेक चित्रपट, मालिकांमध्ये काम केलं आहे. प्रत्येक भूमिकेने त्याला एक वेगळी ओळख दिली आहे आणि प्रत्येक भूमिकेतून त्यातून तो काही तरी शिकत आला आहे, याच विषयी तो एका मुलाखतीत बोलला आहे. नुकतीच त्याने ही मुलाखत सोशल मिडियावर शेयर केली आहे.

स्वप्नीलने अभिनयाची सुरुवात वयाच्या नवव्या वर्षी केली. त्याने रामानंद सागर यांच्या 'उत्तर रामायण' या टीव्ही मालिकेत रामपुत्र कुशची भूमिका साकारली होती. तिथूनच त्याच्या अभिनयाच्या करिअरची सुरुवात झाली. त्यानंतर त्याने रामानंद सागर यांच्याच 'श्रीकृष्ण' या हिंदी मालिकेमध्ये भगवान श्रीकृष्णाची भूमिका केली होती. स्वप्नीलच्या या दोन्ही भूमिका चांगल्या गाजल्या होत्या. त्याशिवाय एका लग्नाची दुसरी गोष्ट, मुंबई पुणे मुंबई,मितवा, तु ही रे अशी न संपणारी लिस्ट आहे. २०१३ साली संजय जाधव दिग्दर्शित 'दुनियादारी' या चित्रपटाला प्रेक्षकांनी अक्षरशः डोक्यावर घेतलं. या चित्रपटातील स्वप्नीलच्या अभिनयाने लोकांचा मनात कायमचं घर केलं आहे.

एका मुलाखतीत अमृता खानविलकरने स्वप्नीला त्याच्या वेग वेगळ्या भूमिकेतून तो काय शिकला हा प्रश्न विचारला, स्वप्नीलने मस्त उत्तर दिले, " एका लग्नाची दुसरी गोष्ट मधल्या घणाने मला साधेपणा शिकवला, दुनियादारीतल्या श्रेयस ने मैत्री.. दुनियादरी शिकवली. मुंबई पुणे मुंबई मधल्या गौतमने 'प्रेम म्हणजे काय? प्रेम हे सांगून होत नाही.. आणि प्रेम हे ठरवून करता येत नाही' ही शिकवलं आणि सर्वात महत्वाचं मी श्री कृष्णाच्या



# विक्रम गोखले यांचा शेवटचा चित्रपट 'सूर लागू दे' लवकरच प्रदर्शित..

मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीवर मागील पाच दशकांहून अधिक काळ अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले (VIKRAM GOKHALE) यांचे शनिवारी 26 ऑक्टोबर रोजी निधन झाले. वयाच्या 77 वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्व शोकाकुल झालेले असतानाच एक दिलासा देणारी बातमी समोर आली. आपल्याला गोखले काकांना पडद्यावर पाहता येणार आहे. त्यांचा 'सूर लागू दे' हा शेवटचा चित्रपट लवकरच प्रदर्शित होणार आहे.



कलाकार आपल्यातून गेला तरी त्याने केलेलं काम हे कायम अजरामर राहत असतं. त्यांच्या कलाकृतीतून ते आपल्याला भेटत असतात. विक्रम गोखले आज आपल्यात नसले तरी ते कलाकृतींमधून आपल्यासोबत राहणार आहेत. लवकरच त्यांचा शेवटचा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'सूर लागू दे' (SUR LAGU DE) असे या चित्रपटाचे नाव असून नुकतंच या चित्रपटाचं पहिलं पोस्टर रिलीज करण्यात आलं आहे. 'सूर लागू दे' या चित्रपटाचे कथानक काहीसे वेगळ्या धाटणीचे आहे असून शीर्षकातच संगीताचा ताल दडलेला आहे. या चित्रपटात राष्ट्रीय पुरस्कार विजेते विक्रम गोखले आणि सुहासिनी मुळये हे दोन दिग्गज कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. तर सुप्रसिद्ध मराठी टीव्ही अभिनेत्री रीना अगरवालही महत्त्वपूर्ण भूमिकेत आहे.

# 'नवा गडी' मालिकेत मोठा ट्विस्ट!

: झी मराठी वरील 'नवा गडी नवं राज्य' ही मालिका प्रेक्षकांच्या भलतीच पसंतीस पडतं आहे. अल्पवधीतच प्रेक्षकांनी या मालिकेला अक्षरशः डोक्यावर घेतलं. आनंदी, राघव, रमा, चिंगी आणि राघवची आई ही पात्र अगदी घरातल्यासारखी होऊन गेली आहेत. एखादा कौटुंबिक नाजूक विषय इतक्या छान पद्धतीने कसा हाताळला जाऊ शकतो याचं उत्तम उदाहरण म्हणजे ही मालिका आहे. लवकरच या मालिकेत मोठा ट्विस्ट येणार आहे.

या मालिकेतून अत्यंत वेगळा विषय हाताळता जात आहे. एका लग्न झालेल्या, ज्याला एक लहान मुलगी आहे, ज्याची बायको नुकतीच देवाघरी गेली आहे अशा पुरुषाशी लग्न करणाऱ्या गोड, निरागस



तरुणीची म्हणजेच आनंदीची ही कथा आहे. आजवर सावत्र आई म्हणजे वाईट बाई ही चौकट देखील या मालिकेने मोडून काढली. शिवाय रोज नवा विचार, नात्यांची नवी ओळख ही मालिका करून देत आहे.

कर्णिकांच्या घरी रोज सकाळी येणारी राघवची बहीण वर्षा काही दिवस घरी न आल्यामुळे आनंदी चिंतेत आहे. वर्षा वारंवार आनंदीवर जाच करूनही आनंदिला मला तिची काळजी आहे. वर्षाच्या आयुष्यात काहीतरी वेगळं घडतंय याची आनंदीला कुणकुण लागलेय. म्हणून आनंदी, रमाच्या मदतीने समजून घेण्यासाठी पहिल्यांदाच वर्षाच्या घरी जाते आणि तिथे वर्षाला न भेटता तिच्या नवऱ्यासोबत तिची भेट होते, या भेटीनंतर वर्षाच्या आयुष्यात नक्की काहीतरी गडबड आहे हे आनंदीला कळतं.

आनंदी ही गोष्ट घरात सगळ्यांना सांगण्याचा प्रयत्न करते पण कोणीच तिच्या बोलण्याकडे लक्ष देत नाही. एकीकडे आनंदीमुळे राघवच्या आयुष्यात नवे रंग भरले जात असताना वर्षाचं सत्य घरातल्यांसमोर कसं आणणार आनंदी ही पाहणे रंजक ठरणार आहे. विशेष म्हणजे सत्य समोर आल्यानंतर आनंदीची भावनिक साद आणि रमाची सुपर पावर वर्षाला तिच्या जाचातून कसं मुक्त करतील हे पाहणं अधिक औत्सुक्याचं असणार आहे.

## पाकिस्तानी गोलंदाजांच्या उडवल्या चिंधड्या,

# रावळपिंडी कसोटीच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडने केले 7 विश्वविक्रम!

### 500 किंवा त्याहून अधिक धावा करणारा इंग्लंड संघ जगातील पहिला संघ ठरला

**नवी दिल्ली ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्धच्या रावळपिंडी कसोटीच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडने अनेक विक्रम केले आहेत. बेन स्टोक्सच्या नेतृत्वाखालील इंग्लंड संघाने तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्याच्या पहिल्याच दिवशी ५०० हून अधिक धावा करत विश्वविक्रम केला आहे. कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी ५०० किंवा त्याहून अधिक धावा करणारा इंग्लंड संघ जगातील पहिला संघ ठरला आहे. यापूर्वी १९१० मध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्ध ऑस्ट्रेलियाने ४९४ धावांचा डोंगर उभा केला होता.




१७ वर्षांनंतर पाकिस्तानमध्ये कसोटी खेळणाऱ्या इंग्लंड संघाने हा सामना संस्मरणीय बनवला. त्याने एक-दोन नव्हे तर एकूण ७ विश्वविक्रम केले आणि एक एक करून अनेक विक्रम केले. कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी ५०० हून अधिक धावा

इंग्लंड संघाने कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी ५०६ धावा करण्याचा विश्वविक्रम आपल्या नावावर केला आहे. कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी ५०० धावांचा टप्पा पार करणारा ते जगातील पहिला संघ ठरला आहे. याशिवाय कसोटी क्रिकेटच्या इतिहासात सामन्याच्या पहिल्या दिवशी चार खेळाडूंनी शतके ठोकण्याची ही पहिलीच वेळ आहे. इतर विक्रमांबद्दल बोलायचे तर, कसोटी सामन्याच्या पहिल्या सत्रात सर्वाधिक 174 धावा करण्याचा विश्वविक्रमही इंग्लंडच्या नावावर आहे. त्याच वेळी, जॅक क्रॉली आणि बेन डकेट यांनी मिळून सर्वात जलद द्विशतक भागीदारीचा विश्वविक्रम केला.

इंग्लंडच्या विक्रमांची यादी इथेच संपत नाही. जॅक क्रॉलीने ८६ चेंडूत आपले शतक पूर्ण केले आणि कसोटीत इंग्लंडसाठी सर्वात जलद शतक झळकावणारा सलामीवीर बनला. त्याचवेळी हॅरी ब्रूक हा कसोटीत सर्वात जलद शतक झळकावणारा इंग्लंडचा तिसरा खेळाडू ठरला. हॅरी ब्रूक आणि बेन डकेटनेही या सामन्यात आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिले शतक झळकावले.

**स्टोक्स आणि ब्रूक नाबाद**

सामन्याबद्दल बोलायचे झाले तर, पाकिस्तानविरुद्ध नाणेफेक जिंकून इंग्लंड संघ प्रथम फलंदाजीला उतरला आणि पहिल्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा ४ गडी गमावून ५०६ धावा केल्या. जॅक क्रॉली आणि बेन डकेट यांनी दमदार सुरुवात केली. या दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी २१६ चेंडूत २३३ धावांची विक्रमी भागीदारी केली. यादरम्यान दोन्ही खेळाडूंनी

# बांगलादेशला मोठा धक्का!

## तस्किन अहमद भारताविरुद्धच्या पहिल्या वनडेतून बाहेर

**नवी दिल्ली, ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था**

तस्किन अहमद पाठिच्या दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या पहिल्या वनडेतून बाहेर पडला आहे. (संग्रहित छायाचित्र-इंडियन एक्सप्रेस)

रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली, भारतीय संघाला बांगलादेशविरुद्ध ३ सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळायची आहे (IND VS BAN). या मालिकेतील पहिला सामना ४ डिसेंबर रोजी शेरे बांगला नॅशनल स्टेडियम, ढाका येथे खेळवला जाईल. मात्र या सामन्यापूर्वी यजमान बांगलादेशला मोठा धक्का बसला आहे. कारण संघाचा स्टार वेगवान गोलंदाज तस्किन अहमद दुखापतीमुळे पहिल्या एकदिवसीय सामन्यातून बाहेर पडला आहे.

विशेष म्हणजे, संघाचा स्टार वेगवान गोलंदाज तस्किन अहमद पाठदुखीमुळे पहिल्याच सामन्यातून बाहेर पडला आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डाचे मुख्य निवडकर्ता मिन्हाजुत अबेदिन यांनी क्रिकबझला ही माहिती दिली. बीसीबीचे मुख्य निवडकर्ता मिन्हाजुल आबेदीन यांनी गुरुवारी क्रिकबझला सांगितले की, "पाठदुखीमुळे तस्किनला वनडेच्या पहिल्या सामन्यातून बाहेर करण्यात आले आहे. "त्याच्या सहभागाबाबत कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आम्ही त्याची प्रगती पाहणार आहोत," असेही ते म्हणाले.




महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
9657767000

महाईन्यूज नोंद असूद्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही